
# Historicity

ISSN : 2393-8900

International Research Journal

Volume - 5 | Issue - 12 | Aug - 2019
Impact Factor : 2.7825(UIF)



Editor-In-Chief
Dr. Sanjay Gaikwad

ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 12 | AUG - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ''नरसिंह सरस्वती चरित्र आणि परंपरा व दत्तसंप्रदायाचा इतिहास'' : ग्रंथपरीक्षण



प्रा.प्रशांत चौधरी
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

## प्रस्तावना :—

महाराष्ट्रामध्ये जे प्रमुख संप्रदाय मध्ययुगीन काळापासून अस्तित्वात आहेत, त्यात दत्तसंप्रदाय हा एक प्रमुख संप्रदाय मानला जातो. या पंथाचे संस्थापक श्री नरसिंह सरस्वती हे आहेत. श्री.नरसिंह सरस्वती यांचे जीवनकार्य व त्यांनी प्रवर्तिलेला दत्तसंप्रदाय याबद्दल नेमक्या शब्दांत आणि यथार्थतेने स्पष्ट करणारा ग्रंथ म्हणून या ग्रंथाचा उल्लेख केला जातो.

या ग्रंथाचे लेखक असणारे रामचंद्र चिंतामण ढेरे यांना आधुनिक मराठीतील थोर संशोधक मानले जाते. विविध लोकसमजुती, लोकदैवते आणि पारंपारिक धारणांसंबंधी शास्त्रीय स्वरूपाचे संशोधनात्मक लिखान श्री.ढेरे यांनी मोठ्या प्रमाणात केले आहे. या ग्रंथात श्री.ढेरे यांनी एकूण पाच प्रकरणांत व तीन परिशिष्ठांच्या सहाय्याने त्यांनी श्री नरसिंह सरस्वती आणि दत्त संप्रदायासंबंधी उद्बोधक माहिती दिली आहे.

मराठी संस्कृतीच्या इतिहासात श्रीनरसिंह सरस्वती यांचे जीवन आणि कार्य चिरस्मरणीय आहे. त्यांनी आपल्या अलौकिक व अद्भूत व्यक्तित्वाच्या प्रभावातून महाराष्ट्रात दत्तोपासनेचा प्रवाह खळाळून वाहू लागला. अनेक साधनांना आणि चिंतकांना त्यांच्या चरित्रातून प्रेरणा प्राप्त झाली; अनेकांची जीवने अनुभूतीच्या अमृतात न्हाऊन निघाली; आणि अनेकांच्या ह्रदयातील दुरितांचे तिमिर दूर झाले, अशा शब्दांत श्रीनरसिंह सरस्वतींच्या अवतार कार्याचे वर्णन प्रारंभी मनोगतात श्री.ढेरे यांनी केले आहे.

ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात दत्तावताराचे रहस्योद्घाटन करतांना इतिहास—पुराणांतील दत्तात्रेयाचे स्वरूप, अर्वाचिन उपनिषधांतील दत्तात्रेय तसेच शाक्त पंथांतील तंत्रोपासना आणि दत्तात्रेय, या मुद्यांच्या आधारे दत्तावताराचे स्वरूप ढेरे यांनी सुस्पष्ट केले आहे. शिवाय याच प्रकरणात दत्तात्रेयाचे मूर्तिवैज्ञानिक स्वरूप, त्रिमुखी दत्ताची संकल्पना इत्यादि मुद्यांचा विस्तृत परामर्ष श्री.ढेरे यांनी घेतला आहे.

ग्रंथातील दुसरे प्रकरण दत्तोपासनेसंबंधीचे असून त्यात पुराणकालीतील दत्तोपासनेपासून नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, समर्थ संप्रदाय, आनंद संप्रदाय, चैतन्य संप्रदाय आणि महाराष्ट्राच्या परीघाबाहेर होणारी दत्तोपासना यांची उद्बोधक माहिती लेखकाने करून दिली आहे.

'श्री नरसिंह सरस्वती : जीवन व कार्य' हे पन्नास पृष्ठांचे तिसरे प्रकरण या ग्रंथाचा गाभा आहे. श्री नरसिंह सरस्वतींचा पूर्वावतार असणाऱ्या श्रीपाद वल्लभांच्या कार्याचा आढावा आरंभी घेऊन तद्नंतर श्री नरसिंह सरस्वती यांच्या जीवनाचा जन्मापासून अवतार धारण करेपर्यंतच्या वाटचालीचा ओघवत्या शैलीत आलेख चितारला आहे. श्री नरसिंह सरस्वतींचे व्यक्तिमत्व आणि कार्य, श्री नरसिंह सरस्वतींचा कालनिर्णय, त्यांची गुरू परंपरा, शिष्यपरंपरा इ. पैलूंची विस्तृत चर्चा या प्रकरणात केली आहे. याच प्रकरणात सरस्वतींच्या ग्रंथसंपदेबद्दलचे विस्तृत विवेचनही श्री.ढेरे यांनी केले आहे.

चौथ्या प्रकरणात दत्तोपासनेच्या माध्यमातून अध्यात्म साधना करणाऱ्या महाराष्ट्रातील नामांकीत व थोर साधू–संतांच्या दत्तसंप्रदायाशी निगडीत कार्यकर्तृत्वाचा आढावा श्री.ढेरे यांनी घेतला आहे. यात जनार्दनस्वामी, एकनाथ, दासोपंत, मुक्तेश्वर, निरंजन, रघुनाथ, नारायण महाराज जालवणकर, माणिक प्रभु, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, वासुदेवानंद सरस्वती, पंतमहाराज बाळेकुंद्रीकर, विष्णुदास, रामनंद बीडकर, दीक्षितस्वामी इ. संत–सज्जनांच्या कार्याचा दत्तोपासनेच्या अनुरोधाने उद्बोधक आढावा घेतला आहे.

ग्रंथाचे अखेरचे प्रकरण 'दत्त–संप्रदाय' या शीर्षकाचे असून त्यात श्री नरसिंह सरस्वती यांचे जीवनकार्य व दत्त संप्रदाय यांची अन्वयार्थकता लेखकाने सुस्पष्ट केली आहे. गुरूसंस्थेचा गौरव स्थापीत करणारा हा संप्रदाय म्हणजे संस्कृति–समन्वयाचे उत्तम उदाहरण आहे, असे श्री ढेरे यांनी प्रकरणात स्पष्ट केले आहे. परिस्थितीच्या प्रतिक्रियेतून हा संप्रदाय उदायास आला व सिध्द पुरूषांच्या साधनेतून त्याने महाराष्ट्राच्या आध्यात्मिक विश्वाला दिशा दिली, असा निष्कर्ष लेखकाने अंतीमत: काढला आहे. याच प्रकरणात लेखकाने दत्त संप्रदायाचे मान्य ग्रंथ आणि संप्रदायाची तीर्थक्षेत्रे यांचीही माहिती दिली आहे. जी अभ्यासकांशी खूपच उद्बोधक अशी आहे.

ग्रंथाच्या अखेरीस श्री दत्तात्रेयाची आरती, दत्तोपासनेच्या क्षेत्रांतील काही सत्पुषांचे काळ व संदर्भ साहित्य हे तीन परिशिष्ट्ये जोडली आहेत. या परिशिष्ठांमुळे प्रस्तुत ग्रंथाची उपयुक्तता खूपच वाढली आहे.

**समारोप :–**

महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाला श्रीनरिसिंह सरस्वती व त्यांनी प्रवर्तिलेल्या दत्तसंप्रदायाने दिलेले योगदान किती मोठे व मौलिक आहे, याची प्रचिती हा ग्रंथ वाचताना येते. संशोधनात्मक लेखनाच्या क्षेत्रात मौलिक भर घालणाऱ्या रा.चिं.ढेरे यांच्यासारख्या सिध्दहस्त लेखकाने या ग्रंथाची निर्मिती केली असल्यामुळे ग्रंथातील माहिती व संदर्भाची विश्वासार्हता कैक पटींनी वाढली आहे.

ढेरे यांची भाषाशैली अत्यंत ओघवती व प्रासादिक अशी आहे. तथापि, तीत कोठेही पाल्हाळीकता किंवा आलंकारिकता आढळत नाही. ढेरे यांच्या लेखनशैलीचा आणखी एक विशेष जाणवतो तो म्हणजे श्रद्धाभाव! ग्रंथाचे चरित्रनायक असणारे श्री नरसिंह सरस्वती असोत किंवा साक्षात् श्री दत्त. या विभूतींचे वर्णन करताना शब्दा–शब्दांतून त्यांचे श्रध्दायुक्त अंत:करण प्रत्ययास येते. नाही म्हणावयास एक उणीव जाणवते. ती ही की पृष्ठसंख्येच्या विस्ताराचे दडपण लेखकावर सतत जाणवते. त्यामुळेच अनेक ठिकाणी आवश्यकता असतानाही लेखाने हात आखडता घेतला आहे, असे वाटते.

एकूणात हा ग्रंथ दत्तसंप्रदायाचे सश्रध्द उपासक आणि विचक्षण वृत्तीचे अभ्यासक या दोघानांही भरपूर काही देणारा ग्रंथ आहे. विशेषत: संशोधनाच्या बाबतीत प्राचीन व मध्ययुगीन कालातील लेखनकृतींचा अभ्यास करण्याबद्दल आजच्या काळात बरीचशी उदासीनता आढळते. या ग्रंथाच्या वाचनामुळे ही उदासीनता कमी होऊन अनेक अभ्यासक या कालखंडाकडे पुन्हा वळतील, असा विश्वास हा ग्रंथ वाचल्यानंतर निर्माण होऊ शकेले.